२

# माध्यमिक व आश्रमशाळेतील अनुसुचित जाती — जमातीच्या विदयार्थ्यांमध्ये अनुपस्थितीच्या कारणांचा तुलनात्मक अभ्यास

**श्री. निलेश निवृत्ती बटवाल**
विलास तांबे शिक्षणशास्त्र महाविद्यालय
डुंबरवाडी ओतूर, ता. जुन्नर, जि.पुणे.

**सारांश**

देशांचा सामाजिक स्तर उंचावण्यासाठी शिक्षणासारखे दुसरे साधन नाही. त्यामुळे देशांतील तळागाळातील माणसापर्यंत शिक्षण पोहचले पाहिजे. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, आंबेडकर, शाहू महाराज, महर्षी कर्वे यांनी मागासवर्गीयांच्या शिक्षणाचा पुरस्कार केला. महात्मा फुले यांनी अस्पृश्यांसाठी १८४३ साली पुण्यात पहिली शाळा काढली. शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात मागासवर्गीय विदयार्थ्यांसाठी शाळा, वस्तीगृह स्थापन केल्यात. समाजातील खालच्या स्तरापर्यंत शिक्षण पोहचले पाहिजे. त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून शासन सुद्धा प्रयत्न करत आहे. डॉ. राधाकृष्ण आयोग, कोठारी आयोग, हया आयोगात मागासवर्गीय विदयार्थ्यांसाठी तरतुदी करण्यात आल्या आहेत. अनुसूचित जाती—जमाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय अशा सामाजिक दृष्टया अपेक्षित घटकांत शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली. मागासवर्गीय विदयार्थ्यांसाठी मोफत शिक्षण, स्कॉलरशिप, पास सेवा गणवेश, वहया, पुस्तके इत्यादी शासनाने योजना राबवल्या आहेत. विविध जमातीपैकी अनुसुचित जाती — जमाती ही अशीच एक आदिवासी जमात समजली जाते. महाराष्ट्रात पुणे जिल्हयात कोळवाडी, जुन्नर, आंबेगाव, माळशेज घाट, पिंपळगाव जोगा, ओतूर, इत्यादी भागात ही जमात वस्ती करून राहते. पुणे जिल्हयामध्ये जुन्नर तालुक्यातील जवळ जवळ ३० गावात ही जमात आहे. अनुसुचित जाती — जमाती जमात हा एक कष्टकरी वर्ग आहे. प्रतिकुल परिस्थितीत त्यांच्या शिक्षणात अनेक कारणांमुळे अडथळे येतात. त्यांच्या हया समस्या लक्षात घेऊन त्या सोडविण्याचा प्रयत्न संशोधनाच्या माध्यमातून केलेला आहे.

## प्रस्तावना

शिक्षण हे भावना व्यक्त करण्याचे व संशोधनात उपयोगात आणण्याचे साधन आहे. त्यामुळे व्यक्तिमत्त्व अधोरेखित होते. आदिवासीच्या संस्कृती प्राचीन व वनावर आधारित आहे. अनुसूचित जातीची समाजोपयोगी सेवक व बुजलेली मानसिकता हीच ओळख आहे. ते ऐहिक बाबतीत कमकुवत व फक्त विशिष्ट सांस्कृतिक ओळख असणारे आहेत. ही ओळखच त्यांची पुंजी आहे. सुशिक्षित समाजाने त्यांची ही बिकट अवस्था समजावून घ्यावी. त्यांनी आदिवासी, मागासवर्गीय संस्कृती यांचा आधुनिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमांमध्ये समन्वय साधावा व हया समाजातील भीती व दुरावा दूर करावा. यासाठी सुशिक्षित समाजावर सर्वसमावेशक व परिपूर्ण अभ्यासक्रम तयार करण्याची मोठी जबाबदारी आली आहे. ही जबाबदारी उचलण्यास हवी कारण समाजातील सर्व घटकांच्या परिपूर्ण सहभागानेच खरी उन्नती होऊ शकते.



Vol: 6th, Issue : II, English-Marathi, Quarterly: 1st Sep 2017,ISSN : 2319-5525

"By Education I mean an all reound dewing out of the best in the child and man, body, mind and spirit." (The mind of Mahatma Ghandhi- P-379)

महात्मा गांधीजी म्हणतात की, "मानवातील उत्कटतेचा शरीर, मन, आत्मा यांचा सर्वागींण विकास घडवून आणणे म्हणजे शिक्षण होय".

शिक्षण समाज परिवर्तनाचे महत्त्वाचे साधन आहे. आदर्श समाजाच्या, राष्ट्राच्या निमिर्तीसाठी आवश्यक असणारे शिक्षण शाळेत दिले गेले पाहिजेत. अशा या शाळेत देशाचे भवितव्य देशांतील वर्गावर्गातून आकारास येत आहे. मानवाने आपल्या बुध्दी कौशल्याच्या जोरावर नेत्रदीप प्रगती केली. तरीपण अजूनही समाजाचा मोठा भाग हा शिक्षणापासून वंचित आहे. अशा मागासलेल्या समाजात शिक्षण नसेल तर आर्थिक आणि सामाजिक प्रगतीसाठी किती ही प्रयत्न केला तरी ते निष्फळ ठरतात.

शेकडो वर्षापासून अविदयेपायी गोरगरीबांची गळचेपी होत असते.

तुम्ही सांगतो बहुता परी, गोष्ट ही खरी शुद्र हिताची

दूर्दशा जी आविदयेपायी, ऐकतो मी ही बहुतांची।।

समाजातील मूठभर लोक शिक्षण घेऊन सुखाची फळे चाखतात तेव्हा समाजातील ठीगभर लोक शिक्षणाच्या अभावामुळे दु:खात पिचकत पडतात. या वर्गाच्या लोकांना दोन वेळेची भाकरी कशी मिळेल या विवचनेने सतत ग्रासलेले असतात. समाजाचा हा मोठा भाग जर शिक्षणापासून वंचित राहिला तर देशांची प्रगती साधने लांबच राहिले, परंतु समाजाचा एक भाग पांगळा, गतीहीन, चैतन्यहीन बनेल.

परंतु अनुसुचित जाती – जमाती समाजातील विदयार्थ्यांमध्ये बहुतांश मुले गरीब, कष्टकरी, मजूर वर्गातील असल्यामुळे ते कामाला अधिक प्राधान्य देतात. त्यामुळे हे विदयार्थी शाळेत अनुपस्थित असतात. ती मुले अभ्यासाच्या प्रवाहात सर्व विदयार्थ्यांबरोबर सहभागी होऊ शकत नाही. परिणामी ते इतर विदयार्थ्यांच्या तुलनेत मागे पडतात म्हणून अनुपस्थितीच्या प्रमाणात वाढ होते. अशा अनुसुचित जाती – जमाती आदिवासी मुलांच्या वारंवार गैरहजर राहिल्यामुळे अनेक समस्या उद्‌भवतात. हया अनुपस्थितीच्या समस्येचा, कारणांचा शोध घेऊन प्रभावी उपाययोजना केल्यास आदिवासी विदयार्थ्यांची शैक्षणिक प्रगती साधण्यास मदत होईल म्हणून या समस्यांचा अभ्यास करण्यासाठी संशोधकाने प्रस्तुत विषय निवडला आहे.

संशोधनाची गरज

मानवाच्या गरजामध्ये कालानुरूप आणि परिस्थितीरूप बदल होत आहे. या गरजांच्या पुर्ततेसाठी मानवाने विविध क्षेत्रात संशोधन करून अनुकूल बदल घडवून आणले आहेत. इतर क्षेत्राप्रमाणेच मनुष्यत्वाचा सर्वांगीण विकास व्हावा. या दृष्टीने शिक्षण क्षेत्रातही संशोधन महत्त्वपूर्ण ठरते.

आधुनिक काळातील शिक्षण प्रवाहात समाजातील सर्वच अपेक्षित घटकांना आणण्यासाठी सदर संशोधनाची गरज आहे. त्यांना उपलब्ध असलेल्या शैक्षणिक सुविधा व संधी तसेच शासनाकडून राबविल्या जाणा—या अनेक शैक्षणिक योजना याबद्दल पुरेशी माहिती नसते. तसेच शिक्षणाबद्दल पुरेशी माहिती नसते. तसेच शिक्षणाबद्दल या समाजात जाणीव जागृतीचा अभाव आहे. तीच जाणीव व जागृती, शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी सदर संशोधन नक्कीच उपयुक्त ठरेल.

त्याचप्रमाणे संशोधक ज्या अनुसुचित जाती — जमातीच्या विदयार्थ्यांच्या समस्याविषयी संशोधन करीत आहे ते विदयार्थी दिवसभर शेतात कामे करतात. तसेच हॉटेल, गॅरेज, भंगार विकणे, गाडीची साफ—सफाई करणे. त्यामुळे ही शारिरीक व मानसिकदृष्टया थकलेली असतात. शिक्षणासाठी जो उत्साह अंर्तमनातून व्हायला पाहिजे ते जागृत होत नाही ते जागृत होण्यासाठी सदर संशोधनाची गरज आहे.

दिवसभराच्या कामामुळे अभ्यास, सराव यासाठी त्यांना आधिक वेळ देता येणे शक्यच नसते. काही विदयार्थ्यांना अभ्यासाची, शिक्षेची, इंग्रजी सारख्या विषयाची भिती वाटते. अशा अनेक कारणांमुळे ते स्वत:चा आत्मविश्वास गमवितात व एकंदर नापास होतात किंवा शाळेत सतत गैरहजर राहतात पण ज्यांना शिक्षणाची जिज्ञासा आहे काही बनण्याची इच्छा आहे मग तो शिक्षणापासून वंचित का राहावेत?

यासाठी संशोधकाने सदर संशोधनासाठी विषयाची गरज लक्षात घेऊन हे संशोधन हाती घेण्याची गरज आहे.

संशोधन समस्या विधान

“जुन्नर तालुक्यात कोळवाडी गावामध्ये माध्यमिक व आश्रमशाळेतील अनुसुचित जाती — जमातीच्या विदयार्थ्यांमध्ये अनुपस्थितीच्या कारणांचा तुलनात्मक अभ्यास करणे”.

संशोधन समस्येच्या कार्यात्मक व्याख्या

१) माध्यमिक शाळा

इयत्ता ८,९,१० वी पर्यंतच्या वर्ग असणा—या शाळांना माध्यमिक शाळा म्हणतात. (राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६)

२) आश्रमशाळा

आदिवासी, गरीब व जे शिक्षणापासून वंचित असलेले विदयार्थ्यांना शासनाकडून मोफत सर्वसोयी, सुविधा शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणारी संस्था म्हणजे आश्रमशाळा होय.

३) अनुसुचित जाती — जमाती

देशांत अगदी प्रथम वस्ती करून राहिलेली व शैक्षणिक व अर्थिक दृष्टया मागासलेली एक जात होय.

४) अनुपस्थिती

विदयार्थी शाळेत न येता काही कारणांमुळे सतत गैरहजर असणे.

१.४ संशोधनाचे शीर्षक

माध्यमिक व आश्रमशाळेतील अनुसुचित जाती — जमातीच्या विदयार्थ्यांमध्ये अनुपस्थितीच्या कारणांचा तुलनात्मक अभ्यास”.



Vol: 6th , Issue : II, English-Marathi, Quarterly: 1st Sep 2017,ISSN : 2319-5525

संशोधनाची उद्दिष्टे

१. माध्यमिक, आश्रमशाळेतील अनुसुचित जाती – जमातीच्या विदयार्थ्यांच्या अनुपस्थितीची कारणे शोधणे.

२. या शाळेतील अनुसुचित जाती – जमातीच्या विदयार्थ्यांच्या अनुपस्थितीच्या कारणांचा अभ्यास करणे.

३. तसेच या शाळेतील अनुसुचित जाती – जमाती, आदिवासी विदयार्थ्यांच्या अनुपस्थितीची तुलना करणे.

४. माध्यमिक, आश्रमशाळेतील अनुसुचित जाती – जमाती आदिवासी विदयार्थ्याची उपस्थिती वाढविण्यासाठी उपाय सुचविणे.

संशोधनाची व्याप्ती

१. प्रस्तुत संशोधन माध्यमिक व आश्रमशाळा या शाळेशी संबंधित आहे.

२. प्रस्तुत संशोधन हे अनुसुचित जाती – जमाती आदिवासी विदयार्थ्याशी संबंधित आहे.

३. प्रस्तुत संशोधन अनुसुचित जाती – जमाती आदिवासी विदयार्थ्यांच्या अनुपस्थितीशी संबंधित आहे.

४. प्रस्तुत संशोधन हे सन २०१४—२०१५ या शैक्षणिक वर्षाशी संबंधित आहे.

संशोधनाची मर्यादा

१. प्रस्तुत संशोधन 'जुन्नर' तालुक्यातील कोळवाडी गावापुरतेच मर्यादित आहे.

२. प्रस्तुत संशोधनाचे निकर्ष हे माध्यमिक व आश्रमशाळेमधील अनुसुचित जाती – जमाती आदिवासी विदयार्थ्यांच्या अनुपस्थित राहणा—यांना लागू पडतील.

संशोधन पध्दती

प्रस्तुत संशोधनात सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब केला आहे.

संशोधनाची साधने

सदर संशोधनामध्ये स्वनिर्मित प्रश्नावली देऊन मिळालेल्या माहितीच्या आधारे त्या माहितीचे सांख्यिकीय विश्लेषण व अर्थनिर्वचन खाली संख्याशास्त्रीय आधारे केले आहे.

१) शेकडेवारी

२) आलेख

अशा प्रकारे संशोधकाने प्रासंगिक पध्दतीने नमुना निवड करून संशोधनाची साधने व तंत्रे वापरून संशोधनातील समस्येचे निष्कर्ष काढलेली आहे.

पालकांच्या मुलाखतीवरून निष्कर्ष काढलेली आहेत. त्यावरून काही उपाययोजना सुचविल्या गेल्या आहेत.

संशोधनाचे उदिदष्टानुसार निष्कर्ष

संशोधन विषयासंबंधी उपलब्ध असणा—या आधार सामग्रीचे अर्थनिर्वचन केले असता संशोधनातून पुढील निष्कर्ष निघतात.

१) उदिद्ष्टे १ नुसार निष्कर्ष

माध्यमिक व आश्रमशाळेतील अनुसुचित जाती – जमाती आदिवासी विदयार्थ्यांच्या अनुपस्थितीची कारणे शोधणे.

१. अनुसुचित जाती – जमाती आदिवासी विद्यार्थ्यांना आईला घरकामात व वडीलांना शेतात मदत करावी लागते म्हणून त्या विदयार्थ्यांचे अनुपस्थितीचे प्रमाण जास्त दिसून येते. (कोष्टक क्र. २ नुसार)

२. अनुसुचित जाती – जमाती आदिवासी विदयार्थ्यांच्या घरची परिस्थिती गरीबीची असल्यामुळे ती मुले कामाला मजुरी करण्यासाठी जातात. हे सुध्दा अनुसुचित जाती – जमाती विदयार्थ्यांचे अनुपस्थितीचे प्रमुख कारण आहे.



Vol: 6th , Issue : II, English-Marathi, Quarterly: 1st Sep 2017,ISSN : 2319-5525

१. माध्यमिक व आश्रमशाळेतील अनुसुचित जाती — जमाती विदयार्थ्यांना शिक्षण घेताना काही प्रमाणात समस्या जाणवतात. म्हणून ते शाळेत अनुपस्थित राहतात.
२. आरोग्य विषयक समस्या हे अनुसुचित जाती — जमाती आदिवासी विदयार्थ्यांच्या अनुपसिथतीचे एक कारण आहे. (कोष्टक क्र. २ नुसार)
३. अभ्यास न केल्यामुळे शिक्षक जी शिक्षा देतात म्हणून विदयार्थ्यांचे अनुपस्थितीचे प्रमाण जास्त आहे.

२) उदिद्ष्टे २ नुसार निष्कर्ष

अनुसुचित जाती — जमाती आदिवासी विदयार्थ्यांच्या अनुपस्थितीच्या कारणांचा अभ्यास करणे.

१. अनुसुचित जाती — जमाती आदिवासी विदयार्थ्यांच्या अनुपस्थितीची आर्थिक कारणे पालकांचे दारिद्रय व शैक्षणिक विकास नसल्याने कुटूंबासाठी आर्थिक हातभार लावण्यासाठी पालक विदयार्थ्यांना मजूरीसाठी नेतात.
२. अनुसुचित जाती — जमाती आदिवासी विदयार्थ्यांच्या अनुपस्थितीची कौटुंबिक कारणे कुटुंबात मुलांची संख्या जास्त असणे, पालकांच्या व्यसनामुळे, कौटुंबिक संघर्षामुळे, अज्ञानामुळे, चुकीच्या रूढी, अंधश्रध्दा ही कारणे आहेत.
३. या शाळांमध्ये बौध्दिक व आनंददायी खेळांचे प्रमाण कमी असल्यामुळे अनुसुचित जाती — जमाती आदिवसी विदयार्थ्यांना शाळेची गोडी वाटत नाही. (कोष्टक क्र. शि. ८ नुसार)
४. शासन अनुसुचित जाती — जमाती आदिवासी विदयार्थ्यांसाठी जरी सेवा सुविधा पुरवत असले तरी त्या वेळेवर व नियमित पोहचत नाहीत.

३) उदिद्ष्टे ३ नुसार निष्कर्ष

शाळेतील अनुसुचित जाती — जमाती आदिवासी विदयार्थ्यांच्या अनुपस्थितीच्या कारणांचा तुलना करणे.

१. माध्यमिक शाळेत अनुसुचित जाती — जमाती आदिवासी विदयार्थ्यांच्या अनुपस्थितीचे प्रमाण जास्त आहे तर आश्रमशाळेत हे प्रमाण कमी दिसून येते
२. माध्यमिक शाळेतील अनुसुचित जाती — जमातीच्या विदयार्थ्यांच्या पालकांना शिक्षणावरील खर्च झेपत नाही. मात्र आश्रमशाळेतील पालकांच्या विदयार्थ्यांच्या शिक्षणावरील अनुपस्थितीचे प्रामण दिसून येते.
३. आश्रमशाळेच्या तुलनेने माध्यमिक शाळेत शिकणा—या अनुसुचित जाती — जमाती आदिवासी विदयार्थ्यांना कामाला जावे लागते कारण त्यांची घरची परिस्थिती गरीबीची असते.
४. माध्यमिक विदयार्थ्यांच्या तुलनेत आश्रमशाळेतील विदयार्थ्यांना शाळा शिकण्याबाबत आवड आहे. असे असून सुध्दा ते शाळेत अनुपस्थित राहतात.

४) उदिद्ष्टे ४ नुसार निष्कर्ष

माध्यमिक व आश्रमशाळेतील अनुसुचित जाती — जमाती आदिवासी विदयार्थ्यांची उपस्थिती वाढविण्यासाठी उपाय सुचविणे.

१. अनुसुचित जाती — जमाती समाजातील पालकांना शिक्षणाचे महत्त्व समजावणे. होतकरू व हुशार विदयार्थ्यांना आर्थिक मदत करणे
२. माध्यमिक शाळेत अनुसुचित जाती — जमातीच्या विदयार्थ्यांच्या उपस्थिती वाढविण्यासाठी पालक मेळावे घेणे, शासनाकडून शिष्यवृत्ती देणे, पोषण आहार, विदयार्थ्यांच्या आर्थिक गरजा लक्षात घेऊन त्यांना वेळोवेळी मदत करणे.
३. पालकांमध्ये साक्षरता निर्माण करणे. हे अनुपस्थितीचे प्रमाण कमी करण्याचा एक उपाय आहे.

४. गैरहजेरी टाळण्यासाठी शाळेत विविध सभा घेतल्या जातात. परंतु त्यास पालकांचा सहभाग मिळत नसल्याने उदिद्ष्टे साध्य होत नाही.
५. या पालकांमध्ये शिक्षणाविषयक जाणीव जागृती निर्माण करण्याचे प्रयत्न केले जातात पण पालक त्याकडे दुर्लक्ष करतात.

अंतिम निष्कर्ष

१. ब—याच मुलींना घरकाम, शेतीकाम, लहान भावंडांना सांभळणे ही कामे करावी लागतात.
२. विदयार्थ्यांना उच्च शिक्षण दयावेसे वाटते.
३. अनुसुचित जाती — जमाती आदिवासी विदयार्थी वर्गातील इतर विदयार्थ्यांमध्ये मिळून मिसळून वागत नाहीत, त्यामुळे त्याचे सामाजिकीकरण होण्यास अडथळा निर्माण होतो.
४. अनुसुचित जाती — जमाती आदिवासी विदयार्थी लाजराबुजरा असल्याने शैक्षणिक शंका मनमोकळेपणाने शिक्षकांना विचारत नाहीत.
५. विदयार्थ्यांना शालेय शैक्षणिक साहित्याचा शासनाकडून पुरवठा होतो.
६. पालक केवळ आर्थिक लाभ घेण्यासाठी शाळेत त्वरीत येतात.
७. शिक्षकांना या विदयार्थ्यांचा सर्वे करतांना पालकांकडून योग्य प्रतिसाद मिळत नाही.
८. सहशालेय उपक्रमात सदर विदयार्थी फारसा सहभाग घेत नाही.
९. पालकांमध्ये निरक्षरतेचे प्रमाण अधिक आहे.
१०. सदर विदयार्थ्यांना शब्दांचे शुध्द व स्पष्ट उच्चारण करतांना अडचणी येतात.
११. सदर विदयार्थी वाचनात, शुध्दलेखनात चुका करतात.

शिफारशी :— विदयार्थी —

१. अनुसुचित जाती — जमातीच्या विदयार्थ्यांनी आपल्या समस्या मुख्याध्यापक व शिक्षकांना सांगून त्यातून काही तरी मार्ग ते शोधून देतील.
२. अनुसुचित जाती — जमाती समाजातील विदयार्थ्यांना आपल्या पालकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दयावेत.
३. या समाजातील विदयार्थ्यांनी सुट्टीच्या दिवशी कामे करून आई— वडिलांना मदत करावी.
४. अर्धवेळ शाळा असेल तर घरकामाबरोबर शिक्षण घेता येईल हे पालकांना पटवून दयावे.

शिक्षक :—

१. विदयार्थ्यांच्या गैरहजेरीच्या कारणांचा शोध घेऊन त्यांचे निराकरण करण्यासाठी प्रभावी उपाययोजना करणे आवश्यक आहे.
२. पालकांशी सतत संपर्क करून त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दयावे. जास्त गैरहजर असणा—या विदयार्थ्यांच्या पालकांचे उद्‌बोधन करावे.
३. शाळेमध्ये पालक सभा, माता—पालक सभा नियमितपणे घेऊन पालकांचे उद्‌बोधन करावे.
४. शासनाकडून आदिवासी विदयार्थ्यांना मिळणा—या सुविधा विदयार्थ्यांपर्यत तत्परतेने पोहविण्याची व वितरणाची कार्यवाही करावी.
५. विदयार्थ्यांची वैयक्तिक स्वच्छता, आरोग्य, शालेय परिसर सफाई याकडे जास्त लक्ष पुरवावे.

पालक

१. आपल्या पाल्यास नेहमी व वेळेवर शाळेत पाठवावे व त्याच्या अभ्यासाकडे लक्ष दयावे.
२. पाल्याचे शिक्षण त्याच्या व्यक्ती विकासाला पोषक आहे. हे लक्षात घेऊन त्याला शिक्षणापासून वंचित न ठेवण्याची दक्षता घ्यावी.
३. शिक्षक—पालक, माता—पालक सभांना नियमितपणे उपस्थित राहणे.
४. शाळेत घेणा—या विविध उपक्रमांत सहभागी व्हावे.
५. पाल्यांच्या आयोग्य , पोषण व शिक्षण हे गरजेचे आहे हे जाणून त्याला सातत्याने शाळेत पाठविण्याचा प्रयत्न करणे.

संदर्भ


१. भितांडे वि.रा. (२००८) 'श्शैक्षणिक संशोधन पध्दती', पुणे: नित्यनूतन प्रकाशन , पान नं. १० ते १३).

२. दुनाखे अरविंद व देशपांडे लीना 'प्रगत शैक्षणिक समाजशास्त्र', पुणे: नित्यनूतन प्राशन, ( पान नं. ३४, ३५)

३. पारसनीस हेमलता, देशपांडे लिना (१९९९ पुर्नमुद्रण)'श्शैक्षणिक कृती संशोधन', पुणे:नूतन प्रकाशन — ३०

४. प्रा.श.तु.भगत, 'शिक्षणातील थोर विचारवंत', (पान नं. १०४), चैतन्य प्रकाशन: कोल्हापूर.

५. वा.गो.आपटे, 'विस्तारीत शब्दरत्नाकार', पुणे, शब्दकोश ६०, ५५९ (पान नंबर ९३,११५).


...